# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा
## प्रश्नपत्रिका एक--विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक २१ जुलै, २०१९
[वेळ : सकाळी १०-३० ते दुपारी १-१५]
**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**
**(एकूण गुण- १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

**प्रश्न क्र १ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. १०**

निरंजनची गुरूजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरूजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातला एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला - ‘रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरूजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरूजींवर श्रद्धा ठेवायचा आणि परिक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या-

पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरूजीच करायचे. गुरूजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाही तर नाही.' गुरूजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.

आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खूश होता. नागरिकांची कर्तव्ये कोणती? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे? लोकसभा म्हणजे काय? ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो ? सा-या प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती. अभ्यास करता करता किती वेळ लोटला कुणास ठाऊक. निरंजन ताडकन उठून उभा राहिला. नऊ वाजून गेले होते. साडेदहाची परीक्षा. त्याआधी देशमुखांकडे जायचं होतं. केवढंतरी लांब चालायचं होतं. भराभर आवरून तो निघाला.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-

(अ) निरंजनला मामाने कोणता मोलाचा सल्ला दिला?

(ब) निरंजनने भडसावळे गुरूजींचे कोणते वाक्य लक्षात ठेवून अभ्यास केला ?

(क) निरंजनला कोणत्या प्रश्नांची धडाधड येत होती?

(ड) भडसावळे गुरूजी निरंजनला कोणती मदत करत असत ?

(इ) निरंजनची स्वभाव वैशिष्ट्ये सांगा ?

**प्रश्न क्र २ खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा. २०**

(अ) पंतांना जनोबा रेगे यांचा सल्ला तिरकेपणाचा का वाटला?

(ब) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते' हे विधान स्वानुभवातून स्पष्ट करा.

(क) अब्दुल तपोवनात गेल्यावर तिथले वातावरण कसे होत असे ?

(ड) बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दल आपली तळमळ का व्यक्त केली हे फूटप्रिन्टस् पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(इ) डॉ. माशेलकर यांनी संस्कार केंद्र कोणाला म्हटले आहे ? व का?

(फ) पृथ्वीला वाचवण्यासाठी काय करावे असे कवयित्री अंजली कुलकर्णी यांना वाटते ?

**प्रश्न क्र ३ (अ) खालीलपैकी कोणत्याही दहा प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. १०**

(अ) कोणत्या विचाराने पंतांची झोप उडाली ?

(ब) लहान लहान मुलींनी कोणाभोवती एकदम गलका करायला सुरुवात केली ?

(क) स्क्रीनवर उमटलेला पायपुसणीच्या आकाराचा निळा चौकोन कोणासारखा होता ?

गुण

(ड) लेखकाच्या बाबतीत त्यांचे सर्वस्व कोण होते ?
(इ) जवानाचे रक्षण कसे होणार आहे ?
(फ) चरित्र कसे असते ?
(ग) वाघीण कोठे लपली असावी असे लेखकाला वाटते ?
(ह) यंत्राबरोबर राहिल्यास काय मिळेल ?
(य) झाडांच्या जीवनाचे एक संथ गाणे कोठे दडले आहे ?
(र) लेखकाचे वडील कोणत्या खेळात चॅम्पियन होते ?
(ल) निरंज़नला कशाचा राग येई ?
(व) कवी कोणावर आमुचा अधिकार आहे असे म्हणतो ?

**(ब) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.** ५

(१) उदकाचें सुख तें किती | सवेंचि क्षणे तृषितें होती |
 योगिया दे स्वानंद तृप्ती | सुखासी विकृती पैं नाही |

(२) दोन दिवस वाट पाहण्यात गेले ; दोन दु:खात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे.

(३) हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

**प्रश्न क्र ४ खालीलपैकी कोणत्याही दहा रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** १०

(अ) त्या बाळाला आधी --------- गुंडाळ आणि मग मासे मारत बैस.
(ब) जनोबा रेगे या ------------ काय म्हणावे हे मला कळत नाही.
(क) सा-या ---------- तो एक आनंदाचा आणि चैतन्याचा दिवस.
(ड) ------------ खणखणीत आवाजानं सुमितही जागा झाला आणि हॉलमध्ये आला.
(इ) ------------- एक आंतरिक ओढ वाटू लागली.
(फ) कवितेची शब्दरचना अर्थपूर्ण व ---------असते.
(ग) एका ---------- झाडाखाली, बांबूमध्ये बिबळा बसला होता.
(ह) कोणी नाही असे पाहून ते मला --------- फेकायला बोलले.
(य) आता --------- रेल्वे आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला.

गुण

(र) फुलाफुलांचे दाट ---------- जिथे पोचते दृष्टी.

(ल) मंडळींच्या प्रशस्तीने मला ----------- वाटत होती.

**प्रश्न क्र ५ (अ) खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** **१०**

(१) आयुष्याच सार्थक होणे (२) कानावर पडणे

(३) जिवाचे रान करणे (४) विपर्यास करणे

(५) आर्जव करणे (६) निगा राखणे

**(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचे अर्थ लिहा.** **५**

(१) सहवास (२) परिचय

(३) दीन (४) आकाश

(५) भाग्य (६) गाव

**प्रश्न क्र ६ (अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच रिकाम्या जागी योग्य ते नाम लिहा.** **५**

(१) पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी --------- दिसला.

(२) ------------ यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला.

(३) अब्दुल ----------- आला तेव्हा कार्यक्रम सुरु झाला होता.

(४) ---------- हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते.

(५) कवींनी म्हटल्याप्रमाणे मरूभमीचे ----------- होते.

(६) दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी ----------- शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा.

**(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा.** **५**

(१) तो <u>मुलगा</u> गरिबांना मदत करतो.

गुण

(२) मनाची <u>एकाग्रता</u> हवी.

(३) काका हे एक शास्त्रीय <u>सत्य</u> आहे.

(४) तुमच्याशी <u>मैत्री</u> करायला खूप आवडेल मला.

(५) लवकरच पुन्हा <u>सूर्य</u> आकाशातून आग ओकू लागले.

(६) लिंबाचा <u>रस</u> तर मला अमृतासारखा वाटू लागला.

**(क) पुढीलपैकी कोणत्याही पाच नामांची वचने बदला.** ५

| | |
|---|---|
| (१) दगड | (२) गोष्ट |
| (३) बदली | (४) किंकाळी |
| (५) गाडी | (६) शाळा |

**(ड) पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांपासून नामे बनवा.** ५

| | |
|---|---|
| (१) क्षेत्रीय | (२) सुवासिक |
| (३) पौराणिक | (४) राष्ट्रीय |
| (५) काल्पनिक | (६) साप्ताहिक |

**(इ) पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांच्या संधी सोडवा.** ५

| | |
|---|---|
| (१) शुभेच्छा | (२) चंद्रोदय |
| (३) महोत्सव | (४) परमेश्वर |
| (५) विद्यार्थी | (६) गिरीश |

**(फ) कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे बदल करून कोणतीही पाच वाक्ये पुन्हा लिहा.** ५

(१) एवडा संयम नाही तूमच्यात?
(वाक्य शुद्ध करून लिहा.)

(२) लोकांनी तयार केलेली सुंदर फुलदाणी अब्दुलला मिळाली.
(विशेषण ओळखा. )

(३) शालीमुळे शालीनता येते की जाते ?
(वाक्याचा प्रकार ओळखा.)

(४) तो तसाच उभा राहिला.
(कर्त्याचे लिंग बदल करा.)

(५) नामांकित <u>शाळामधले</u> प्रवेश बंद झाले होते.
(अधोरेखित नामांचे वचन बदलून वाक्य लिहा. )

(६) स्नेहलला स्वत:चाच राग आला.
(काळ ओळखा.)

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**
**प्रश्नपत्रिका दोन--सुसंगत लेखन व अनुवाद**

रविवार, दिनांक २१ जुलै, २०१९
[वेळ : दुपारी २.१५ ते सायंकाळी ४.४५]
**(एकूण गुण- १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत

गुण

**प्रश्न क्र. १ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा.** २०

(अ) प्लास्टिक एक समस्या
(ब) साक्षरता विकासाचा पाया

**प्रश्न क्र. २ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा.** २०

(अ) शेतकरी आत्महत्या कारणे आणि उपाय यांविषयी चर्चा करा.
(ब) सार्वजनिक सण - उत्सव आणि कायदा - सुव्यवस्था यांविषयी चर्चा करा.

**प्रश्न क्र. ३ खालीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा.** ३०

(अ) एखादा कर्मचारी वारंवार समज देऊनही कामामध्ये चुका करतो यास्तव त्याला कारणे दाखवा नोटीस बजावण्यासाठी टिप्पणी व पत्राचे प्रारूप तयार करा.
(ब) कुटुंब नियोजन योजनेखालील विशेष नैमित्तिक रजा मिळण्याबाबत संबंधित अधिका-यास विनंतीपत्र लिहा.
(क) पदवी पर्यंतच्या मुलींना मोफत एस्. टी प्रवास सुरू करण्यासाठी संबंधित अधिका-यास विनंतीपत्र लिहा.
(ड) निवडणूकीच्या कर्तव्यावर असताना जखमी व मृत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत परिपत्रक तयार करा.

**प्रश्न क्र.४ खालीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्द प्रयोगांसाठी मराठी पर्याय द्या.** ५

(अ) Processing Centre
(ब) Initial enquiry
(क) State income
(ड) Union Territory
(इ) Voluntary grant
(फ) Written order

गुण

**प्रश्न क्र.५ खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा.** १०

(अ) The President shall make rules for the more convenient transaction of the business of the Government of India, and for the allocation among Ministers of the said business.

(ब) No person shall be a member of both Houses of Parliament and provision shall be made by Parliament by law for the vacation by a person who is chosen a member of both Houses of his seat in one House or the other.

(क) A person shall not be deemed to hold an office of profit under the Government of India or the Government of any State by reason only that he is a Minister either for the Union or for such State.

(ड) A Bill pending in Parliament shall not lapse by reason of the prorogation of the Houses.

(इ) If any question arises whether a Bill is a Money Bill or not, the decision of the Speaker of the House of the People thereon shall be final.

(फ) Each House of Parliament may make rules for regulating, subject to the provisions of this Constitution, its procedure and the conduct of its business.

**प्रश्न क्र. ६ खालील उता-याचे मराठीत भाषांतर करा.** १५

If at any time there should not be a quorum of the Judges of the Supreme Court available to hold or continue any session of the Court, the Chief Justice of India may, with the previous consent of the President and after consultation with the Chief Justice of the High Court concerned, request in writing the attendance at the sittings of the Court, as an ad hoc Judge, for such period as may be necessary, of a judge of a High Court duly qualified for appointment as a Judge of the Supreme Court to be designated by the Chief Justice of India.

It shall be the duty of the Judge who has been so designated, in priority to other duties of his office, to attend the sittings of the Supreme Court at the time and for the period for which his attendance is required, and, while so attending he shall have all the jurisdiction, powers and privileges, and shall discharge the duties, of a Judge of the Supreme Court.

------------------------